## - पोलीस शिपाई भरती २०१९ -

पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची ६१ पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे भरण्यात येणार आहेत. हया बद्दलची सविस्तर माहिती www.navimumbaipolice.gov.in आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास (१) पोलीस आयुक्त यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. पोलीस शिपाई, पदासाठी उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावा लागेल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा **www.mahapariksha.gov.in** या पोर्टलवर उपलब्ध राहणार आहे.
- सर्व पोलीस शिपाई या पदांचे आवेदन अर्जासाठी उमेदवाराची एकच लेखी परीक्षा महापरीक्षा पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने आधी घेण्यात येणार आहे. शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे मोजमाप व शारिरीक चाचणी अर्ज भरलेल्या पोलीस घटकामार्फत घेण्यात येईल. दोन घटकातील शारीरिक चाचणीच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी हया कार्यालयाची राहणार नाही व त्यामध्ये बदल करता येणार नाही. एकाच पोलीस घटकातील एकाच पदासाठी दोन अर्ज करण्यास मुभा नाही. असे आढळल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीनंतर ज्या उमेदवाराची निवड होईल त्यांचीच सर्व मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीव्दारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम लेखी परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. त्यानंतर गुणवत्तेनुसार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल.** लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीत प्राप्त झालेल्या गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional Selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधीन राहून व मा.उच्च न्यायालय , मुंबई यांनी जनहित याचीका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झलेल्या याचीकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांनी पदे भरण्याचा अधिकार आहे.



Scanned by CamScanner

- शासनाने लागु केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागु केलेले आरक्षण हे या अनुषंगाने उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधिन असेल.
- जाहिरातीतील नमूद केलेल्या रिक्त पदांची एकूण संख्या/पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहू जाहिरात काळजीपूर्वक वाचून, समजून घेवून व रिक्त पदांबाबतची खातरजमा करुन उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.



Scanned by CamScanner

# संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची जाहिरात

महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१९
पोलीस आयुक्त, नवी मुंबई

जाहिरात क्रमांक पोआ/नमुं/आस्था/पो.भरती-१९/०१/२०१९,  ठिकाण - नवी मुंबई  दिनांक ३१/०८/२०१९

*महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक १८.०१.२०१९ व दिनांक ०४/०७/२०१९ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी ६१ पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे*

**१ पोलीस शिपाई :**

| | अ.जा. | अ.ज. | वि.ज.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | १५ | ० | २ | ४ | ४ | ० | ० | ३६ | ० | ० | ० | ६१ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ४ | ० | १ | २ | २ | ० | ० | १० | ० | ० | ० | १९ |
| महिला | ४ | ० | १ | १ | १ | ० | ० | ११ | ० | ० | ० | १८ |
| खेळाडु | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| प्रकल्पग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| माजी सैनिक | २ | ० | ० | १ | १ | ० | ० | ५ | ० | ० | ० | ९ |
| अंशकालीन पदवीधर | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| पोलीस पाल्य | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| गृहरक्षक दल | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | १५ | ० | २ | ४ | ४ | ० | ० | ३६ | ० | ० | ० | ६१ |



Scanned by CamScanner

२) अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी जनहित याचीका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

ड) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकात रिक्त पदे भरतीसाठी उपलब्ध नाहीत.

३) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी <u>पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह</u>, (शा.नि. क्र. जेएलई-२०१५/१६६६/प्र.क्र.३०२/ तुरुंग-१, दि. १५/०१/२०१६ अन्वये) लागू आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह **http://mahapolice.gov.in** या संकेत स्थळावर (Home Page) वर व www.navimumbaipolice.gov.in वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.

महत्त्वाची टिपः-

पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशांची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांना दूरध्वनी क्रमांक ०२२- २५४२७९७९ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्त, नवी मुंबई या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष. पोलीस भरती समिती-२०१९ तथा पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई अथवा पोलीस नियंत्रण कक्ष यांचेशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दूरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था/कार्यालयाचे नाव | दूरध्वनी/मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०२२-२७५७४९२८ |

(राजकुमार व्हटकर )
अध्यक्ष,
पोलीस भरती समिती २०१९
तथा पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई

D:\pallavi\D\Tandel\dubele\Police Bharti 2019\Advertise 2019.docx

Scanned by CamScanner